ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# वारली समाजातील संस्थात्मक परिवर्तन

**श्री.भारत उखाजी सोनवणे,**
पी.जी.टी,
Govt. H.S.S, Khanvel,Dadra Nagar Haweli

**1. प्रस्तावना**

आधुनिक समाजात निरनिराळ्या संस्थांमध्ये सतत परिवर्तन होत आहे. कारण या संस्था एकमेकांशी संबंधित आहेत. त्यामुळे एकात परिवर्तन आले की, त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे इतर संस्थांवर नक्कीच प्रभाव पडतो. एका संस्थेशी संबंधित नियम आणि समाजिक आंतरक्रियेचे स्वरूप सर्व समाजात एकसारखे असत नाही. भारतीय समाजाच्या विवाह, कुटुंब, नातेवाईक, धर्म, आणि राजकारणाच्या संस्थामध्ये असणारे नीतीनियम आणि आंतर क्रियांचे स्वरूप एक सारखे नसते. सामाजिक संस्थांच्या इतक्या प्राथमिक समाजशास्त्रीय माहितीच्या अनुसंधानात जवळजवळ सर्व समाजाच्या निर्माण व्यवस्थेत काम करणाऱ्या मुख्य संस्थांचा व त्या अनुषगाने वारली समजाच्या सामाजिक संस्थामध्ये झालेला बदल झालेला आहे. वारली समाजाच्या सामाजिक संस्थामध्ये झालेला बदल म्हणजे खालील पाच सामाजिक संस्थामध्ये झालेला बदल होय. महाराष्ट्रातील आदिवासींच्या लोककलांत वारलींची चित्रकला (वारली चित्रकार पद्‌मश्री जिव्या सोमा म्हशे) विशेष प्रसिद्ध आहे.

**1. संशोधनाचे उद्देशः**

1. वारली समाजाच्या कुटुंब संस्थेतील परिवर्तन अभ्यासणे.
2. वारली समाजाच्या विवाह संस्थेतील परिवर्तन अभ्यासणे.
3. वारली समाजाच्या आर्थिक संस्थेतील परिवर्तन अभ्यासणे.
4. वारली समाजाच्या धार्मिक संस्थेतील परिवर्तन अभ्यासणे.
5. वारली समाजाच्या शिक्षण संस्थेतील परिवर्तन अभ्यासणे

**2. वारली जमातीची वैशिष्ट्येः**

1. परंपरा व नवता यांच्या प्रभावानुसार जीवन जगणाऱ्या वारली जमातींची अनेक वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. वारली पुरुषांची उंची साधारणपणे पाच ते सहा फुट असते. स्त्रियांही साधारणपणे पाच ते सहा फुट उंचीच्या असतात.
2. नागर लोकांच्या सानिध्यात ते येत असल्यामुळे व नागरी करणाच्या प्रभावामुळे त्यांच्या राहणीमानात बदल होत आहेत.
3. वारली मुलतःस्वाभिमानी वृत्तीने जीवन जगत होते. ते पराक्रमी व कर्तव्यदक्ष होते. पण अलीकडच्या काळात त्यांच्या या मूळ स्वभावात बदल झाला आहे.
4. वारल्यांचे केस निग्रो प्रमाणे कुरळे नसतात. मंगोलियन लोकांप्रमाणे त्यांच्या गालाची हाडे उठून दिसत नाहीत. त्यांचे डोळे लहान हे नसतात. व डोळेही नसतात.
5. उत्तरेकडील भागात वारली स्त्रिया हातात व पायात पितळेचे 'वाळे' घालतात. हे 'धोडी' जमातीच्या स्त्रियांचे अनुकरण वाटते. धोडी स्त्रिया वाळे मोठ्या प्रमाणात घालतात.

6. वारल्यांची खेडी विखुरलेल्या झोपड्यांच्या गटागटांनी वसलेली असतात. या वस्तीच्या गटाला 'पाडा' म्हणतात. दहा-बारा पाड्यांचे एक खेडे बनते. झोपडीच्या भिंती कुडाच्या, शेण-मातीने लिंपलेल्या असतात.

7. या जमातीत सण असे फारसे नाहीत; पण सभोवतालच्या प्रगत समाजांशी त्यांचा सतत संपर्क येत गेल्याने हिंदूंचे दसरा, दिवाळी, होळी, गणेशोत्सव इ. सण त्यांना परिचित झाले आहेत.

**3. वारली समाजातील संस्थात्मक परिवर्तनः**

वारली समाजाच्या सामाजिक संस्थामध्ये बदल झाला म्हणजे नेमका काय बदल झाला ? त्याचे आदिवासी वारली समाजाच्या पारंपारिक समाज जीवनावर काही परिणाम झाले आहे का ? या बदलाची कारणे कोणती आहेत ? याविषयी सविस्तर विश्लेषण व अभ्यास केलेला आहे. डेविस किंग्सले यांच्या मते, संस्था ह्या कोणत्याही एक किंवा एकापेक्षा जास्त कार्यांच्या भोवती रचलेल्या एकमेकांशी संबंधित लोकरीती, लोकनीती आणि कायद्यांचे एक संकुल आहे. प्रत्येक समाज ज्या प्रवृत्ती करतो. त्या त्याच्या संस्थाद्वाराच शक्य होतात. इतकेच नाही तर या संस्थांद्वारा प्रत्येक समाजाचा सांस्कृतिक वारसा सतत टिकून राहतो. आणि म्हणूनच समाज टिकून राहतो.आदिवासी वारली समाजातील संस्थात्मक परिवर्तनाचा संशोधकाने खालील प्रमाणे अभ्यास केलेला आहे.

**4.1 कुटुंबसंस्था व त्यातील परिवर्तनः**

1. वारली समाजाच्या कुटुंबव्यवस्थेत झालेला मुख्य बदल म्हणजे शिक्षणामुळे पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेकडून मातृसत्ताक कुटुंबव्यवस्थेकडे झालेला बदल होय.

2. आधुनिक काळात वारली समाजातील कुटुंब जंगलात, दऱ्या-खोऱ्यांत किंवा डोंगर कपारींमध्ये न उभारता नागर समाजाच्या जवळपास उभारण्यास प्राधान्य दिले जाते.

3. अलीकडच्या काळात कुटुंबासाठी घर बांधताना जंगलातून उपलब्ध होणाऱ्या साहित्याऐवजी पक्क्या विटा व सिमेंट वापरून पक्क्या घरांची उभारणी केली जाते आहे.

4. कुटुंबातील एखाद्या मुलाच्या मुलाचे लग्न झाल्यानंतर झोपडीमध्ये सर्वांना पुरेशी जागा उपलब्ध होत नसे. त्यामुळे मुलाला बापाच्या झोपडीशेजारीच दुसरी झोपडी बदली जात असे. अलीकडे मात्र एकाच कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र राहत यावे दृष्टीने घरांची उभारणी केली जाते.

5. कुटुंबातील एखाद्या सदस्य सर्पदंश, विंचू दंश किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे आजारी पडल्यास त्याला भगताकडे न नेता त्याला दवाखान्यात घेऊन जातात. असे पाहावयास मिळते.

6. वारली कुटुंब / समाज पूर्वी ठाकर, कातकरी, महार, भंडारी, वडवळ या जमातींच्या तुलनेत आपण वेगळे व श्रेष्ठ आहोत अशा प्रकारची भावना कमी झाली असून वारली समाज इतर जमातींबरोबर मिळून मिसळून राहताना आढळतो.

**4.2 विवाह संस्था व त्यातील परिवर्तनः**

1. वारली समाजात 'धवलेरी' बाईकडून लग्न लावले जाते. अलीकडे मुले शिक्षित झाल्यामुळे काही ठिकाणी ब्राह्मणास लग्न लावण्यासाठी बोलवितात. पूर्वी वारली जमातीत ब्राह्मणाकडून लग्न लावत नसत.

2. वारली समाजातील एक कुप्रथा म्हणजे 'कोरड्यावर आणणे' अर्थात विवाहापूर्वीच जोडप्यांना एकत्र आयुष्य जगण्याची परवानगी देणारी हि प्रथा होय. वारली समाजामध्ये शिक्षणामुळे किंवा अनेक समाज सुधारकांनी या समाजामध्ये केलेल्या जनजागृतीमुळे

वारल्यांची कोरड्यावर आणण्याची प्रथा आता नामशेष होत चालली आहे.

3. लग्न लागेपर्यंत पुरुषाला रामराम म्हणण्याचा अधिकार नसतो. लग्न लागल्यानंतर वऱ्हाडक्या त्याला पाठ देतो. पाटील रामराम, नायक रामराम, सरकार रामराम, दरबार रामराम इ.वाक्ये तो वराकडून म्हणवून घेत असे. आधुनिक विवाहप्रसंगी या प्रथेचे फारसे कटाक्षाने पालन केले जातेच असे नाही.

4. घटस्फोटाची पद्धत वारली समाजात देखील रूढ आहे.पूर्वी घटस्फोट मिळविणे फारसे त्रासदायक नसे. ज्या दोघांचे पटत नसेल त्यांनी पंचांकडे जाऊन आपापल्या तक्रारी मांडाव्या लागत असे. आधुनिक परिस्थितीमध्ये मात्र पंचांच्यामार्फत घटस्फोट न देता सनदशीर व कायदेशीर मार्गांचा अवलंब करून संबंधितांची न्याय्य वैद्यक तपासणी करून न्याय निवडा करण्यास वारली कुटुंब प्राधान्य देते आहे.

5. बहुपतीनित्वाऐवजी एकपतीनित्वाचा विचार समाजात रुजू लागला आहे.

6. वारली कुटुंबातील मुलगी विवाहबाह्य संबंधातून गरोदर राहिल्यास तिला पूर्वीप्रमाणे जात पंचायती समोर उभे करून पंचायतीने देऊ केलेला निर्णय बाध्य होता. परंतु अलीकडच्या काळात अशा प्रसंगी सनदशीर व कायदेशीर मार्गांचा अवलंब करून संबंधितांची न्याय्य वैद्यक तपासणी करून न्याय निवडा करण्यास वारली कुटुंब प्राधान्य देते आहे.

7. वारली समाजात विवाह निश्चिती करतांना भगत , भोंदू बाबा, किंवा हेडळी यांना विशेष महत्व होते. अलीकडच्या काळात मात्र भगत, भोंदू बाबा, किंवा हेडळी यासारख्या व्यक्तींचे महत्व या समाजामध्ये कमी होत आहे.

### 4.3 आर्थिक संस्था व त्यातील परिवर्तनः

1. वारली समाजाची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या पद्धती म्हणजे खावटी पद्धती, वेठ पद्धती व हाळी पद्धती होत. या सर्व अमानवी पद्धती होत्या की ज्यामार्फत वारल्यांचे संपूर्ण कुटुंब जमीनदार वा सरंजामदार यांच्या दावणीला बांधले जात असे. यामध्ये आता बराच बदल झालेला आहे.

2. सुशिक्षित वारली युवकांना शासनाने देखील भरीव आर्थिक मदत देऊ केलेली आहे यामुळे वारली समाजाचा आर्थिक स्तर अलीकडच्या काळात उंचावलेला दिसतो.

3. वारली समाजामध्ये देव धर्मास अनन्यसाधारण महत्व आहे. देवधर्मांनुसार आचरण करतांना व देव देवतांवरील श्रद्धा जपतांना मजुरीच्या शोधात पन्नास-साठ किलोमीटरच्या अंतरानंतर गेलेल्यांना व भगताच्या सांगण्यानुसार पूजा बांधतांना फार मोठा आर्थिक फटका सोसावा लागत असे. अलीकडे मात्र अंधश्रद्धाळूपणे विनाकारण केल्या खर्चात मोठी कपात केली जाते आहे.

4. वर्षानुवर्षे वारली जमातीवर सावकारी पाशाचा पगडा आहे. एका बाजूला प्रचंड गरिबी व दुसऱ्या बाजूला पाच-सहा माणसाचं कुटुंब तुटपुंज्या उत्पन्नावर जगत असतं.

5. शेतमजूर म्हणून किंवा जमिनीत कुळ म्हणून किंवा जंगलात कंत्राटदाराकडे मजूर म्हणून हे आपली उपजीविका पार पाडत असत. सर्व जमीनदार व कंत्राटदार नागरी समाजातीलच असत. वारली लोकांची ते अतिशय पिळवणूक करीत असत. अलीकडे वारली समाज व मजूर आता जागृत झालेला आहे.

### 4.4 धार्मिक संस्था व त्यातील परिवर्तनः

1. भगत हाच वारल्यांचा पुरोहित, ज्योतिषी आणि वैद्य असतो. कोणीही आजारी पडल्यानंतर भगताला बोलावितात. आजाराचे अनुमान भगत करतो. विंचू

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

किंवा साप चावल्यास भगत तो उतरवतो. यासारख्या अंधश्रद्धांचे वारली समाजामधून समूळ उच्चाटन होत आहे.

2. 'ब्रह्मा' नावाच्या मुंजावर वारल्यांचा विश्वास असतो. एखादा तरुण मुलगा मेल्यानंतर तो तरुण मुलींच्या मागे लागून त्यांचा उपभोग घेतो. असे त्यांना वाटते. गरोदर स्त्री मेल्यानंतर भूत होऊन एखाद्या झाडाखाली पाळणा हलवीत बसलेली असते. तिला ते हेडली म्हणतात. यासारख्या अंधश्रधाळूपणाचा वारली समाजाने अलीकडच्या काळात त्याग केलेला दिसतो.

3. काही स्त्रिया ह्या भूतळ्या असतात. या स्त्रियांना मंत्रविद्या येत असते. या विद्येचा प्रयोग करून त्या इतरांवर करणी करत असतात.अशा स्त्रियांना ते भूतळ्या म्हणतात. हि भावना आता लोप पावत चालली आहे.

4. मुल जन्मल्यानंतर चिरलेल्या बोरुच्या तीक्ष्ण चिपाटाने मुलाची नाळ कापतात. बाराव्या दिवशी खुद्द बाळाची आईच ती नाळ नदीमध्ये फेकून देते. हि पद्धती आता जवळपास संपुष्टात आलेली आहे.

5. लहान बाळाचे पोट आयुष्यात कधीही दुखू नये म्हणून जन्मतःच दहा दिवसांचे झाले की, छत्रीची काडी तापवून मुलाचे पोट डागले जाते. त्यामुळे पचन चांगले होऊन पोटाचे विकार नाहीसे होतात. असे वारली समाजाला वाटत असे आता मात्र हि अमानवी प्रथा सर्व वारली समाजामध्ये बंद झालेली दिसते.

6. भगताकडे जाऊन भगताईचे शिक्षण घेण्याची प्रथा वारली समाजामध्ये रुजलेली होती. अनेक होतकरू तरुण हे भगतचे शिक्षण घेण्यासाठी मोठी रक्कम मोजत असत. अलीकडच्या काळात मात्र वारली तरुण भगताईचे शिक्षण घेऊन उदरनिर्वाह करण्याऐवजी आधुनिक शिक्षण घेऊन कुटुंबाचा सांभाळा करण्यास प्राधान्य देत आहे.

**4.5 शिक्षण संस्था व त्यातील परिवर्तनः**

1. वारली स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण तसेच कार्यात्मक शिक्षणाचे कार्यक्रम वारल्यांच्या सामाजिक परिवर्तनासाठी अनुकूल वातावरण उत्पन्न करत आहेत.

2. शिक्षणाच्या प्रभावाने आदिवासी वारली समाजामध्ये नवे तरुण गतिशील नेतृत्व निर्माण झालेले आहे.

3. शिक्षणाने आदिवासी वारली समाजाला शोषणमुक्त होण्यास समर्थ केले. नवीन मूल्यांचा विकास झाल्याने त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनातही बदल झालेला आहे.

4. आदिवासी वारली समाजातील स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये बौद्धिक आणि वैचारिक जागृती वाढलेली आहे. त्यामुळे त्यांना स्वतःची व स्वतःच्या हक्कांची जास्त जाणीव आली आहे.

5. शिक्षणाच्या प्रसारामुळे वारली समाजातील धार्मिक व समाजिक अंधश्रद्धा यांचे नुर्मुलन होण्यास मदत झालेली आहे.

6. वारली समाजामध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार वाढल्याने आरोग्यविषयक जाणीवजागृती वाढीस लागलेली आहे. नवजात अर्भकाच्या पोटाला डाग देणे, विधवा स्त्रियांना सामाजिक हक्क नाकारणे, विवाहपूर्व संबंधाना मान्यता देणे यासारख्या प्रथांचे निर्मुलन झालेले आहे.

**4.6 सारांशः**

वरीलप्रमाणे संशोधकाने आदिवासी वारली समाजामधील संस्थात्मक बदलांचा आढावा घेतलेला आहे. वारली समाजाची परंपरागत वैशिष्ट्ये आता काळाच्या ओघात

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

बदलली आहेत. शेती करणे, त्यांची बोलीभाषा, त्यांच्या बोलीभाषेवर पडणारा अन्य भाषांचा प्रभाव, वारल्यांचा उंचावलेला जीवनस्तर, त्यांचा मुळचा व आज काही प्रमाणात बदलेला स्वभाव, त्यांची स्वाभिमानी वृत्ती, संकोचित मनोवृत्ती, जमातीच्या मनोवृत्तीतील बदल, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, अर्थसंस्था, धर्मसंस्था व शिक्षणसंस्था या मुलभूत सामाजिक संस्थामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसतो आहे.

**संदर्भः**

1. *डॉ.गारे गोविंद '' आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ '', सुगावा प्रकाशन, पुणे, जुलै -2000*
2. *श्री.नम.बाळू '' वारली लोकगाथा '', मु.पो. तारापूर, ता.पालघर, जि.ठाणे, पहिली आवृत्ती, 2003.*
3. *प्रा.कुलकर्णी.वि.श्री '' भारतातील आदिवासी वंश '', महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्.ती मंडळ, मुंबई, 2002*
4. *डॉ.तुकाराम विनायक '' आदिवासी साहित्यः स्वरूप आणि समीक्षा '', विजय प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, 1994.*
5. *अंधेर महादेव '' आम्ही आदिवासी वारली '', महाराष्ट्र विद्या मंदिर, सूत्रकार पो.कर्झे, ता.तलसरी, जि.ठाणे, प्रथम आवृत्ती-2003.*